CMYK

बीड । मंगळवार

०८.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : ०९

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955



## बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने...



# कृषी मंत्री माणिक कोकाटे यांच्या प्रतिमेस शेण फासुन जोडे मारले

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री यांनी शेतकऱ्यांनविषयी केलेल्या बेताल व अपमानास्पद वक्तव्याबद्दल शिवसेनच्या मध्यवर्ती कार्यालयासमोर जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले, यावेळी पदाधिकारी व शिवसैनिक यांच्या वतीने कोकाटे यांच्या प्रतिमेस शेण फासून जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर सिंघन यांनी बोलताना सांगितले की महायुती शासनातील माणिक कोकाटे हा मंत्रीमंडळात ठेवण्यासाठी लायक नसुन वारंवार शेतकऱ्यांना बद्‌दूल बेताल वक्तव्य करित आहे, यामुळे जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांनची अवहेलना होत असुन त्याला ताबडतोब मंत्री पदावरून काढले पाहिजे, यापूढे कोकाटेनी अशी बेताल बडबड केल्यास शिवसैनिक त्याला फिरु देणार नाहीत असा इशारा देण्यात आला यावेळी गणेश वरेकर, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, तालुका प्रमुख गोरख अण्णा सिंघण, युवा नेते मुकेश भैय्या घुमरे, जिल्हाप्रमुख जिल्हा सचिव श्रीकृष्ण गायके, युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, उपतालुकाप्रमुख दादासाहेब सोनवणे, उपतालुकाप्रमुख राजेश काकडे, किसान सेनेचे तालुका संघटक भिमराव कुटे, युवा नेते विनोद गुंड पाटील, सर्कल प्रमुख आसाराम खांडे, सर्कल प्रमुख दिपक कांबीलकर, माजी सरपंच सखाराम मोहिते, कैलास बंन, किशोर गायके, विठ्ठल कथले, प्रकाश गोकुळे, मदन जामकर, विजय मानेकर, अभिषेक वरेकर, हरिभाऊ गोरे, उपसरपंच बाळु कुटे, बाबु कुटे, आसाराम वैध, प्रविण आनेराव यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## "सरकारने आखलेल्या चुकीच्या धोरणांचे ओझे सामान्य माणसांवर आले"; जयंत पाटलांची टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

सोमवारचा दिवस भारतीयांसाठी एकामागून एक धक्के देणारा ठरला. सकाळी शेअर बाजारात हाहाकार उडाल्याचे पाहायला मिळाले. सेन्सेक्स ३००० अंकांनी घसरला तर निफ्टीने १२०० अंकांनी खाली आला. मात्र, बंद होताना बाजार काहीसा सावरला. या धक्क्याने गुंतवणूकदारांचे १९ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफच्या घोषणेचे तीव्र पडसाद जगासह भारतीय शेअर बाजारावर उमटल्याचे पाहायला मिळाले. यातच पेट्रोल, डिझेलच्या उत्पादन शुल्कात केंद्र सरकारने दोन रुपयांची वाढ जाहीर केली. तसेच त्यानंतर लगेचच एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात ५० रुपयांची वाढ करण्यात आल्याची माहिती



समोर आली.

केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील एक्साईज ड्युटी वाढवली तसेच गॅस सिलिंडरचे दरही वाढवले. यामुळे महागाई वाढून सामान्य जनतेच्या खिशाला मोठा भूर्दंड पडला आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची सरकारवर जोरदार टीका केली आहे.

सामान्य माणसाचे कंबरडे मोडले जात आहे

आज सकाळीच शेअर मार्केट गडगडले आणि सामान्य मध्यम वर्गीय माणसाला त्याचा धक्का बसला. या धक्क्यातून सावरत नाही

▶▶ उर्वरित पान २ वर

# अंबाजोगाईतील सकलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित

### आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश; मंदिराचे जतन आणि संवर्धन होणार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने अंबाजोगाई येथील ऐतिहासिक आणि प्राचीन सकलेश्वर महादेव मंदिर (बाराखांबी मंदिर) हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे या ऐतिहासिक मंदिराच्या संवर्धन आणि संरक्षणास चालना मिळणार असून पर्यटनासही चालना मिळणार आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी सकलेश्वर मंदिरास संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळविण्यासाठी सातत्याने राज्य शासनाकडे पाठपुरवा केला होता. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत राज्य शासनाने या संदर्भातील



अधिसूचना जारी केली आहे. अंबाजोगाई येथील सकलेश्वर मंदिर १२व्या शतकातील यादवकालीन स्थापत्यशैलीचे उत्तम उदाहरण मानले जाते. या मंदिराच्या परिसरात इतर पाच मंदिरांचे पुरावशेष व जवळपास ११८ प्राचीन शिल्पावशेष आढळले आहेत. तसेच, मंदिराच्या सभोवताली मजबूत बारा खांब असल्यामुळे त्याला 'बाराखांबी मंदिर' असेही संबोधले जाते. हे मंदिर अद्वितीय असून आपल्या स्वरूपातील मराठवाड्यातील एकमेव असे मंदिर असल्याचे राज्य शासनाने नमूद केले आहे. या मंदिराला ऐतिहासिक, स्थापत्य, धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मोठे महत्त्व आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक भगवान शंकराच्या दर्शनासाठी येतात. शिवरात्री, श्रावण महिना आणि महाशिवरात्रीला येथे विशेष पूजेचे आयोजन केले जाते. अंबाजोगाईतील या प्राचीन वैभवाचे

▶▶ उर्वरित पान २ वर

## 138 एकर जमीन बळकवण्याचा 'राजकीय गुंडां'चा डाव

# शेतकऱ्यांना जीवे मारण्याची धमकी

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या दगडवाडीत गावगुंडांकडून शेतकऱ्यांना धमकी मिळत असल्याचे समोर आले आहे. १३८ एकर जमीन बळकवण्याचा राजकीय गुंडांचा डाव आहे. गावगुंडांकडून पाच लाख रुपये द्या आणि एक एकर जमीन द्या अशी खंडणीची मागणी करण्यात आली आहे.

आम्हाला रोज जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत. पोलिसांमध्ये तक्रार देऊनही कुठली दखल नाही. राजकीय वरदहस्त वापरून १३८ एकर जमीन बळकवायची आहे. पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी गावगुंडांकडून शेतकऱ्यांना त्रास दिला जातो. जमीन सोडा नाहीतर तुम्हाला संपूवू अशा धमक्या येत आहेत, असं येथील शेतकऱ्यांनी सांगितले आहे.




मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला तीन महिने पूर्ण होत आहेत. अशातच हे प्रकरण दगडगावामध्ये समोर आले आहे. बीडच्या शिरूर तालुक्यातील दगडवाडी येथील शेतकरी सिताराम नागरे, बाबासाहेब नागरे, रवींद्र नागरे, किसन कठाळे, राम नागरी, गणेश कठाळे, महादेव कठळे या शेतकऱ्यांची जमीन बळकवण्याचा गावगुंडांकडून प्रयत्न चालू आहे. या प्रकरणी तक्रार त्यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आणि पोलीस अधीक्षकांना दिली आहे. पाटोदा बीड आणि छत्रपती संभाजी नगरच्या हायकोर्टात देखील शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय असताना ही जमीन राजकीय गावगुंडांना बळकवायची आहे. ही जमीन पवन ऊर्जा प्रकल्पाला देण्याचा हट्ट आहे. यामधून त्यांना लाखो रुपये मिळवायचे आहेत, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

मला रोज धमक्या दिल्या जातात. बीड जिल्ह्यामध्ये दररोज अशा घटना चालू आहेत. यामध्ये संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि मस्साजोगमध्ये पवनचक्की प्रकल्प आणि आज पवनचक्की प्रकल्पातून मागण्यात आलेली खंडणी याच्यानंतर संतोष देशमुख यांची झालेली हत्या हे प्रकरण अजून थांबायचं नाव घेत नाहीं. तर दुसरीकडे बीडच्या शिरूर तालुक्यातील दगडवाडी येथील शेतकऱ्यांनी आम्हाला न्याय द्या अशी मागणी पत्र द्वारे केली आहे.




## मतिमंद मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास 20 वर्षांची सक्तमजुरी

### सरकारी वकील अ‍ॅड. लक्ष्मण फड यांचा युक्तिवाद ठरला प्रभावी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मतिमंद मुलीवर वारंवार बलात्कार करून गर्भवती करणाऱ्या आरोपी गोविंद मुंजाबा रूद्रे यास जिल्हा व सत्र न्यायाधीश संजश्री घरत यांनी २० वर्षांची सक्त मजुरी व ३० हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.



वानटाकळी (ता. परळी) येथे नातेवाईकांकडे राहण्यासाठी आलेल्या आरोपीने मतिमंद पीडित मुलीचा शारीरिक व मानसिक गैरफायदा घेत अनेक वेळा बलात्कार केला. पीडिता गर्भवती राहिल्यानंतर प्रकार उघडकीस आला. २० जून २०२१ रोजी अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास अधिकारी एन.पी. पवार यांच्या सखोल तपासानंतर आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. न्यायालयासमोर सरकार पक्षातर्फे ड. लक्ष्मण फड यांनी युक्तीवाद केला की, प्रकरणात आरोपी हा तिच्या गर्भातील अपत्याचा बाप होता. तसेच पिडीत मुलगी ही तिच्यासोबत काय घटना घडत आहे व त्या घटनेचे काय परीणाम होतील, हे कळणे इतपत तिची बौद्धीक क्षमता नव्हती. ही बाब सरकार पक्षाने सिद्ध केली. त्यामुळे प्रकरणात आरोपीने पिडीतेच्या बौद्धीक व्यंगाचा गैरफायदा घेवुन पिडीतेवर वारंवार अतिप्रसंग केले. ही बाब सरकार पक्षाने सिद्ध केली. याकामी डीएनए अहवाल व मनोविकार तज्ज्ञ डॉ. कृष्णा कदम यांची साक्ष महत्त्वाची ठरली. पीडितेची बौद्धिक क्षमता कमी असल्याचे न्यायालयात सिद्ध झाले. न्यायालयाने कलम ३७६ (२)(एल) व ३७६ (२)(एन) अन्वये आरोपीस शिक्षा ठोठावत एकत्रितपणे २० वर्षांची सक्त मजुरी आणि ३० हजार रूपये दंड ठोठावला. तसेच दंडाची रक्कम पीडित मुलीस देण्याचे आदेशही देण्यात आले. याप्रकरणात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ड. लक्ष्मण फड यांनी काम पाहिले तर पैरवी म्हणुन एएसआय गोविंद कदम यांनी त्यांना मदत केली. न्यायालयाच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# उन्हाळ्यात मुलांना घरगुती पेय द्या !

सध्या सर्वत्र उन्हाचा जोर वाढतो आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा अधिक उकाडा सहन करावा लागणार असल्याचा अंदाज हवामान खात्यानेही वर्तवला आहे. राज्यात काही ठिकाणी मुलांच्या परीक्षा संपून शाळांना सुट्टी पडली आहे. अभ्यासाचा ताण नसल्याने मुले दिवसभरातील अधिकाधिक वेळ खेळण्यात व्यतीत करत आहेत. बाहेर खेळायला जाणाऱ्या मुलांना उन्हातान्हाची पर्वा नसते. अधिक वेळ उन्हात राहिल्याने घामावाटे शरीरातील पाणी आणि क्षार निघून जातात ज्यामुळे थकवा येतो. अशावेळी मुले घरी येऊन पालकांकडे कोल्ड्रिंक्स पिण्यासाठी पैसे मागतात. बऱ्याचदा पालकही त्यांना पैसे देऊन त्यांची इच्छा पूर्ण करतात. सध्या बाजारात मिळणारे अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे कोल्ड्रिंक्स लहान मुलांसाठी अपायकारक आहेत. अशा कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर ठळक अक्षरांत तशी सूचना लिहिणेही बंधनकारक करण्यात आले आहे. ही कोल्ड्रिंक्स जिभेला रुचकर वाटून मनाला गारवा देणारी असली तरी ती बनवण्यासाठी रसायनांचा आणि प्रीझर्वेटिव्हचा वापर करण्यात येत असल्याने लहान मुलांच्या नाजूक शरीरासाठी ती अत्यंत हानिकारक असतात. आहारतज्ज्ञांच्या मते कोल्डड्रिंक्समध्ये जास्त प्रमाणात साखर असते. साखर जास्त प्रमाणात पोटात गेल्याने मुलांमध्ये लठ्ठपणा वाढू शकतो. मुले जास्त प्रमाणात कोल्ड्रिंक्स पिट असतील तर त्यांच्या शरीरातील कॅलरीज वाढल्याने त्यांचे अनावश्यक वजन वाढू शकते. कोल्ड्रिंक्समध्ये असणाऱ्या साखर आणि अन्य रासायनिक घटकाकांमुळे मुलांचे दात किडण्याचा धोका संभवतो. थंड आणि रसायनयुक्त असलेले हे कोल्ड्रिंक्स दातांच्या मुळांना कमकुवत करतात. मुलांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण वाढल्याने मुलांमध्ये टाइप २ डायबिटीसचा धोका वाढू शकतो. काही थंड



पेयांमधील रसायनांच्या अतिवापरामुळे मुलांच्या हाडांतील खनिजांचे प्रमाण कमी होऊन हाडे कमकुवत होतात ज्यामुळे मुलांमध्ये हाडांच्या दुखापतीचा आणि फ्रॅक्चरचा धोका वाढतो.

१०० टक्के फळांचा रस असण्याचा दावा करणारे काही कंपन्यांचे फ्रुट ज्यूसचे टेट्रा पॅक बाजारांत उपलब्ध आहेत ; मात्र त्यामध्ये प्रत्यक्षात फळांचा रस किती आणि इतर रसायने किती आहेत हे पॅकेटवरील घटकांचे प्रमाण वाचल्यावरच लक्षात येते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत असे तयार कोल्ड्रिंक्स मुलांना देऊन त्यांच्या आरोग्याशी खेळण्याऐवजी घरी तयार केलेले कोकम सरबत, लिंबू सरबत, ताक किंवा बाजारातून ताजी फळे आणून मुलांना फळांचा रस द्यावा. घरगुती पेय प्यायल्याने उन्हामुळे मुलांच्या शरीरात निर्माण होणारी पाण्याची कमतरता तर भरून निघेलच शिवाय मुलांना व्हिटॅमीन्स आणि मिनरल्ससुद्धा या पेयांतून मिळेल. केवळ मुलांसाठीच नव्हे तर मोठ्यांनीही उन्हाळ्यात रासायनिक शीतपेय पिण्याऐवजी घरगुती पेय पिऊन आपली रोगप्रतिकारक शक्ती आणि आरोग्य जपावे !

– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई

# फास्टफुडमुळे वाढतोय कर्करोगाचा धोका !

सध्या मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. कॅन्सर सारख्या जीवघेण्या आणि असाध्य आजाराचे प्रमाण मुलांमध्ये वाढण्याचे कारण शोधण्यासाठी संशोधकांनी संशोधन केले. या संशोधनाचा अहवाल बमेडमध्ये प्रकाशित करण्यात आला. या अहवालात मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढण्यास फास्टफुडला जबाबदार धरण्यात आले आहे. संशोधकांनी असा दावा केला आहे की फास्टफुडमुळेच मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे.

हा अहवाल मुलांसह पालकांच्याही डोळ्यात अंजन घालणारा आहे. आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेषतः शाळकरी मुलांना तर



फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. तीन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुडचा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजार होऊ शकतो हे आता संशोधनानेच सिद्ध झाले आहे त्यामुळे आतातरी पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

पान १/४ वरून पुढे...

## “सरकारने आखलेल्या....

तोच आज केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवर प्रति लिटर २ रुपये एक्साईज ड्युटी वाढवली आहे. त्यामुळे पेट्रोल डिझेलही महाग होणार आहे. घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीतही ५० रुपयांची वाढ झाली आहे. उद्यापासून नवीन किमती लागू होणार आहे. सरकारने आखलेल्या चुकीच्या धोरणांचे ओझे सामान्य माणसाला हाकावी लागत आहे. त्यात सामान्य माणसाचे कंबरडे मोडले जात आहे, असे ते म्हणाले

दरम्यान, जागतिक बाजारात क्रूड ऑईलचे दर सातत्याने कमी होत असताना त्याचा फायदा देशातील जनतेला होत नाही. आज आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑईल ६५ डॉलर प्रति बॅरल असताना देशात पेट्रोलचे दर १०९ रुपयाच्या आसपास तर डिझेलचे ९३ रुपयांच्यावर आहे. भाजपा सरकार इंधनावर अन्यायकारक झीजिया कर आकारून जनतेची लूट करत आहे. क्रूड ऑईलचे कमी झालेले दर व कररुपी लूट कमी केली तर पेट्रोल ५१ रुपये आणि डिझेल ४१ रुपये प्रति लिटर करणे शक्य आहे ते सरकारने करून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

## अंबाजोगाईतील सकलेश्वर...

अनन्यसाधारण महत्व लक्षात घेत आ. नमिता मुंदडा यांनी सकलेश्वर मंदिरास राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी या संदर्भात शासनाला पत्रव्यवहार करून मंदिराच्या ऐतिहासिक महत्त्वावर भर दिला आणि संवर्धनाची मागणी केली. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे आणि अवशेष अधिनियम, १९६० अन्वये सकलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार सकलेश्वर मंदिराचा ९, ७३७ चौ. मीटर परिसर संरक्षित करण्यात आला असून त्यापैकी १९२ चौ. मीटर हे संरक्षित स्मारक क्षेत्र असणार आहे. यानिमित्ताने अंबाजोगाईचा ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार, पर्यटनमंत्री शंभूराज देसाई, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. मुंदडा यांनी आभार मानले आहेत. दरम्यान, सकलेश्वर मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळाल्याने स्थानिक नागरिक, भाविक आणि इतिहासप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मंदिराच्या संरक्षणासाठी शासनाच्या या निर्णयाचे स्वागत होत

पान १/४ वरून पुढे...

आहे. या निर्णयामुळे मंदिराचे जतन आणि संवर्धन होणार असून, भविष्यात पर्यटन क्षेत्रातही मोठी भर पडणार आहे. मूळच्या आर्किटेक्ट असणाऱ्या आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे शक्य झालेला हा निर्णय सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी ऐतिहासिक ठरणार आहे.

## पाटोदा येथे रामजन्मोत्सव...

गजर करीत फूलांची उधळण केली, तत्पूर्वी राम जन्मोत्सवा निमित्त समिति मार्फत ह. भ. प. प्रतिभाताई गायकवाड यांच्या वाणीतून या राम कथेचे आयोजन करण्यात आले होते. रामजन्मोत्सवा नंतर त्यांचे हरीकीर्तन पार पडले. तत्पूर्वी रामजन्मोत्सवानिमीत्त शहरातून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते , तब्बल साडे सात फुट उंचीची भव्य श्री राममुर्ती मिरवणुकीचे आकर्षण होते,या निमीत्त संपुर्ण शहरातुन रथामध्ये ठेवण्यात आलेल्या राममुर्तीची भव्य मिरवणुक काढण्यात आली , या प्रसंगी उत्सव समीतीच्या कार्यकर्त्यांसह रामभक्त नागरीकांची मोठया संखेने उपस्थिती

## घरकुलांचे बांधकाम...

अनुसूचित जमाती करीता शबरी आवास योजना व आदिम आवास योजना तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती करीता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व ईतर मागास वर्ग प्रवर्गासाठी मोदी आवास योजना,अहिल्यादेवी आवास योजनांसह घरकुलांच्या ईतर योजनातुन जवळपास ७६ हजारांच्या पुढे घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.मात्र प्रशासनाचे वाळु टेंडर झालेले नाही. जी वाळु बांधकाम कामगारांना घ्यावी लागते ती जवळजवळ ४० ते ५० हजारांना ५-६ ब्रास वाळू मिळते. एवढ्या मोठ्या रकमेची महागडी वाळु घेऊन घरकुलाचे बांधकाम करणे शक्य नसल्याने केवळ आणि केवळ वाळुमुळे घरकुलाचे बांधकाम रखडलेले आहेत. मध्यंतरी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घरकुल धारकांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा केली.मात्र त्याचा शासन आदेश न आल्याने घरकुल धारकांना वाळु मिळत नाही. त्यामुळे शासन आदेश पारीत करण्यात यावेत.

राज्य शासनाच्या वाढीव ५० हजार अनुदानितील १५ हजार रुपये सोलरसाठी हि जाचक अट रद्द करण्यात यावी

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ (सन २०२५ ते सन २०२८-२९) अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्यातुन ५०,००० ईतकी अतिरिक्त वाढ करण्यात आली आहे. मात्र यापैकी ३५ हजार रूपये बांधकामासाठी आणि १५ हजार रुपये सरकार प्रधानमंत्री सुर्यघर योजनेंतर्गत सौर ऊर्जा यंत्रणेसाठी खर्च करणार असुन जे ही यंत्रणा उभी करणार नाहीत त्यांना १५ हजार मिळणार नाहीत.हि जाचक

पान १/४ वरून पुढे...

अट रद्दबातल करण्यात यावी. इ )मागील क्रमांक ३ बीड जिल्ह्यातील वाळुघाटांचे स्थगित लिलाव सुरू करावेत सध्या बीड जिल्ह्यात एकही वाळूघाट सुरू नाही. दोन महिन्यांनंतर पावसाळ्याला सुरूवात होणार आहे. बीड जिल्ह्यात वाळू घाटांचे लिलाव स्थगित करण्यात आले आहेत. शेजारच्या जिल्ह्यामध्ये मात्र वाळूघाट सुरू आहे. परिणामी बीड जिल्ह्यात गोरगरिबांना वाळू मिळणे अवघड झाले असून त्यांचा बांधकामाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे जिल्ह्यात तातड्याने वाळु घाटांचे स्थगित लिलाव सुरू करण्यात यावेत.

## राष्ट्रसंत कैकाडी...

म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप नेते ज्ञानेश्वर मेंडके होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर राष्ट्रवादीचे नेते मोहनराव जगताप बहुजन नेते बाबुराव पोटभरे भाजप तालुका अध्यक्ष अरुण राऊत शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले अझाद क्रांती सेनेचे संस्थापक राजेश घोडे माजी नगराध्यक्ष नानाभाऊ शिंदे ज्येष्ठ नेते अच्युतराव लाटे,शरद यादव,दिगंबरराव जाधव आप्पासाहेब खेत्रे नानासाहेब घोडके, विलास नेमाने, सचिन जावळे, भारतराव तांगडे सचिन उजगरे राजेश साळवे उपस्थित होते उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमंमध्ये समाज भूषण असलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विठ्ठलराव गायकवाड, प्राध्यापक सविताताई गायकवाड प्राध्यापक गोविंद जाधव लातूर आदर्श शिक्षक मारोतराव शहापूरकर यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून गौरविण्यात आले

यावेळी मनोगत व्यक्त करताना मोहनराव जगताप यांनी राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांच्या कार्याची सविस्तर मांडणी करत महाराजांनी आयुष्यभर कुठल्याही एका जातीसाठी काम न करता त्यांनी सर्व मानव जातीच्या कल्याणासाठी तपश्चर्या करत समाजाला दिशा दर्शक असे काम केले असल्याचे सांगितले

यावेळी बाबुराव पोटभरे ज्ञानेश्वर नाना मेंडकेअच्युतराव लाटे तुकाराम येवले प्राध्यापक गोविंद जाधव प्राध्यापक सविता गायकवाड दिगंबर जाधव यांचीही समितीत भाषणे झाली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक वाडेकर सर यांनी केले तर आभार विठ्ठलराव गायकवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव गायकवाड तालुकाध्यक्ष बाबासाहेब जाधव ,राजेश मेंडके गोरख मेंडके नवनाथ गायकवाड अंकुश मेंडके शिवाजी गायकवाड नारायण मेंडके सागर गायकवाड नितीन गायकवाड आकाश गायकवाड अविनाश गायकवाड आधी तरुण कार्यकर्त्यांनी परिसरात घेतले

पान १/४ वरून पुढे...

## जयभिम महोत्सवात...

महापुरुष वक्तृत्व स्पर्धांचे परीक्षण ड.नितीन वाघमारे,प्रणित सरवदे यांनी केले.महापुरुष वक्तृत्व स्पर्धांचे प्रास्ताविक सुमेध जोगदंड यांनी केले. सूत्रसंचालन सचिन वडमारे,सुनिल डोंगरे तर आभार प्रा.अशोक गायकवाड यांनी केले.जयभिम महोत्सवातील उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे असे आवाहन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

## कपड्याला इस्त्री...

बंगालीपिंपळा येथे सोमवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेने बंगालीपिंपळा सह परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. गणेश मोहनराव तळतकर (वय ३८ वर्ष) रा.बंगालीपिंपळा ता.गेवराई जि.बीड असे विजेच्या धक्क्याने मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. गणेश तळतकर या तरुणाचे बंगालीपिंपळा गावात सीएससी सेंटर तसेच फोटो स्टुडिओचे दुकान आहे. पिकविमा तसेच ऑनलाईन कामे व फोटोग्राफीच्या माध्यमातून गणेश याची परिसरात मोठी ओळख होती. सतत हसतमुख व कधी कोणालाही न दुखावणारा व कायम मित्रांच्या गराड्यात वावरणारा गणेश तळतकर हा सोमवारी सकाळी आंघोळ करुन साडेसात वाजण्याच्या सुमारास स्वतःच्या कपड्याला घरीच इस्त्री करत होता. यावेळी अचानक इस्त्रीमधून विजेचा तिव्र शॉक बसल्याने गणेश जाग्यावर कोसळला. यानंतर जखमी अवस्थेत गणेशला ग्रामस्थांनी रुग्णालयात दाखल केले असताना डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. गणेश तळतकर यांच्या निधनाची बातमी कळाल्यानंतर परिसरातील असंख्य नागरिकांनी बंगालीपिंपळा येथे धाव घेतली होती. दरम्यान बीड जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर बंगालीपिंपळा येथे दुपारी दोन वाजता मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. गणेश याच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुली, एक मुलगा, भाऊ भावजय, पुतणे असा मोठा परिवार आहे.

## मिस्त्रीची लेक...

मोलमजुरी, कष्ट करून गुजरान करीत होत्या. आज मी देखील गवंडी म्हणून काम करतो. मला दोन मुली आहेत त्यापैकी प्राची अभिनय क्षेत्रात काम करते, तर मोठी मुलगी पुण्यात शिक्षण घेतेय याचा मला प्रचंड आनंद आणि अभिमान वाटतो. प्राचीनी निवडलेले क्षेत्र तिच्या स्वप्नांना बळ देणारे आहे. मी बाप म्हणून प्राचीसाठी कुठेही उभे रहायला तयार आहे, पण तिचे स्वप्न साकार व्हावे, हीच देवाचरणी प्रार्थना, अशी प्रतिक्रिया प्राचीचे वडील अनिल सोनवणे यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त दिली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# विधीसंघर्षित मुलांच्या पुनर्वसनासाठी हेल्प डेस्क

## मानवाधिकार व शाश्वत मानवी विकासासाठी अझीम प्रेमजी यांच्या प्रस्तावास मुख्यमंत्री यांची मान्यता विधीसंघर्षित मुलांसाठी हेल्प डेस्क उपक्रम पुन्हा सुरु: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

मुलांचे हक्क व विधीसंघर्षित मुलांचे पुनर्वसन करण्यासाठी, कायदेशीर, सामाजिक, समुपदेशन सेवा पुरविण्यासाठी राज्यातील निरीक्षणगृहांमध्ये हेल्प डेस्क स्थापन करण्याचा प्रस्ताव दातृत्वशील उद्योगपती अझीम प्रेमजी यांनी दिला होता. त्यांच्या या प्रस्तावास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. हे हेल्प डेस्क सामाजिक संस्थांमार्फत चालविण्यात येणार आहेत.

न्याय प्रविष्ट प्रकरण असलेल्या मुलांच्या (उहळश्रवीशप ळप उेपषश्रळलीं ुळींह डर्ु - उउङ) पुनर्वसनासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था , किशोर न्याय कक्ष (ठउगग) आणि महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यात ऐतिहासिक करार करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले की, हेल्प डेस्क' स्थापन करणे उउङ मुलांकडे सन्मानाने व सहवेदनेने पाहण्याचा प्रयत्न असून, त्यांच्या सामाजिक-कायदेशीर स्वरूपाच्या शंका, तक्रारी ऐकून त्यांना मदत करण्याचे एक साधन आहे. यामुळे लहान वयातच योग्य मार्गदर्शन देऊन, या मुलांना समाजासाठी उपयुक्त ठरणाऱ्या नागरिकांमध्ये रूपांतरित करण्याचा शासनाचा हा प्रयत्न आहे.

न्यायप्रविष्ट प्रकरण असलेल्या मुलांशी संबंधित प्रश्न हे केवळ मानवाधिकारांचेच नव्हे, तर शाश्वत मानवी विकासाचेही गंभीर मुद्दे आहेत. अशा मुलांचे पुनर्वसन करणे ही महाराष्ट्र शासनाची अत्यावश्यक व उदात्त जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. या हेल्प डेस्कच्या स्थापनेनंतर कायदेशीर प्रक्रिया अधिक समजून घेतली जाईल, मुलांचे शोषण व गैरसमज कमी होतील, न्यायिक प्रक्रियेत पारदर्शकता व मुलांचा आत्मविश्वास वाढेल, पुनर्वसन व समाजात पुनः एकत्रीकरणास चालना मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री यांनी व्यक्त केला.

गुन्हेगारीत अडकलेली अनेक मुले गरीब, दुर्बल घटकांतील असून त्यांना कायदेविषयक माहितीचा अभाव असतो. अनेकदा वकिलांकडून दिशाभूल, समाजातील कलंक व भावनिक आघात यामुळे न्याय प्रक्रियेत अडथळे येतात. पालकही अनेकदा कायदेशीर प्रक्रियेबाबत अनभिज्ञ असतात, तसेच मुलांनी अमली पदार्थापासून दूर राहण्यासाठी त्यांचे समुपदेशन व मार्गदर्शन करण्यासाठी या हेल्प डेस्क ची मदत होणार आहे.

तसेच उउङ व त्यांच्या पालकांना त्यांच्या हक्कांची व कायदेशीर प्रक्रियेची माहिती देणे, बाल न्याय मंडळ, वकील, उथउ व अन्य संबंधित यंत्रणांशी समन्वय, प्रशिक्षणप्राप्त स्वयंसेवकांद्वारे सातत्यपूर्ण सेवा या हेल्प डेस्क द्वारे दिली जाणार आहे. हा उपक्रम प्रथम टप्प्यात नागपूर, यवतमाळ, लातूर, पुणे आणि ठाणे या पाच जिल्ह्यांत राबविण्यात येणार असून, दरवर्षी किमान ४००० मुलांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट आहे. यानंतर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात हा उपक्रम विविध स्वयंसेवी संस्थांच्या (NGOं) सहकार्याने राबविला जाईल.

### हेल्प डेस्क अंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रमुख सेवा:-

- किशोर व पालकांना किशोर न्याय प्रणालीविषयी माहिती, मार्गदर्शन
- कायदेशीर सहाय्य व पुनर्वसनासाठी संदर्भ सेवा
- सामाजिक तपासणी अहवाल तयार करणे व सादर करणे
- शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण, व्यसनमुक्ती व फॉलोअप सेवा
- २४ तास हेल्पलाईन सेवा
- बाल न्याय (बालकांची व संरक्षण) व इतर घटकांशी समन्वय व प्रलंबित प्रकरणांचे निवारण

# महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेला प्रतिसाद

## जयभिम महोत्सव: शेकडो विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग





### एक हजार विद्यार्थी बसले होते परिक्षेस

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून गुरुवार (दि.३) एप्रिल रोजी महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा तालुका पातळीवर घेण्यात आली होती. त्या परीक्षेला एकूण एक हजार विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा बीड शहरातील तुलसी महाविद्यालय येथे रविवार (दि.६) एप्रिल रोजी पार पडली त्यामध्ये शेकडो विद्यार्थी परीक्षेस बसले होते.**

**बीड । प्रतिनिधी**

राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडली.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने सुयोग्य नियोजन केले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये ४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात रविवार (दि.६) एप्रिल रोजी तुलसी महाविद्यालयात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदवला होता. महापुरुष सामान्य ज्ञान परीक्षेला अध्यक्ष म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख गौतम चोपडे, प्रमुख पाहुणे म्हणून तुलसी महाविद्यालयाचे प्राचार्य देविदास निकाळजे, सुमेध जोगदंड, डॉ.विनोद किर्दत आदी उपस्थित होते.या स्पर्धेचे प्रस्ताविक प्रा.अशोक गायकवाड, सूत्रसंचालन ड.राजेश शिंदे, आभार सचिन वडमारे यांनी केले.

स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने सुयोग्य नियोजन केले होते.जयभिम महोत्सवातील कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

# प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात पदवीदान समारंभ उत्साहात साजरा



**नेकनूर । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर आणि माऊली विद्यापीठ केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर येथे माजी विद्यार्थी व पालक मेळावा तसेच २०२४-२५ चा पदवीदान समारंभ शनिवार आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून माऊली विद्यापीठाचे कोषाध्यक्ष नवनाथरावजी थोटे साहेब तर प्रमुख पाहुणे म्हणून नेकनुर ग्राम पंचायतचे उपसरपंच सचिन शिंदे, बीड जिल्हा काँग्रेस सरचिटणीस आजम पाशा, परिवहन विभागाचे पीएसआय श्री जाधवर विजयकुमार, प्रमुख उपस्थित होते. तर पालक म्हणून अय्यूब मनियार,शेख मुज्जमिल जाहांगिरदार, सय्यद साजेद अली , शेख सर,मुळे ,दाभाडे, दिनकर शिंदे केशव अंकुशे, सय्यद अमन , बाळासाहेब येडे, गणेश कुटे,इत्यादी पालक हजर होते.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कलाणे के.के. यांनी केले. याप्रसंगी बोलताना म्हणाले की, शिक्षक विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये सुसंवाद साधला जावा म्हणून माजी विद्यार्थी मेळावा पालक मेळावा व पदवीदान समारंभ अशा कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात येते. प्रमुख पाहुणे नेकनूर ग्रामपंचायतचे उपसरपंच श्री सचिन शिंदे यांनी म्हटले की विद्यार्थ्यांनी पदवीचा उपयोग आपल्या जीवनात करून घ्यावा व मिळालेल्या डिग्रीचा उपयोग जीवनात करावा.

# जिल्हाधिकारी तहसिलच्या दारी

## शिधापत्रिका, अर्थसहाय्य योजना, प्रलंबित जमिन मोजणी ;असे अनेक प्रश्न तात्काळ निकाली



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी तहसिलच्या दारी या उपक्रमामुळे आज अनेक नागरिकांचे तात्काळ प्रश्न निकाली निघाले. त्यात प्रामुख्याने शिधापत्रिका, सामाजिक अर्थसहाय्य योजना, जमिनीच्या मोजणीचे प्रलंबित प्रकरणे,फेरफार प्रकरणेशा एक ना अनेक समस्या निकाली काढण्यात आल्या. अनेक प्रकरणांमध्ये ई केवायसी प्रलंबित असल्याने लाभार्थ्यांना लाभ मिळण्यात विलंब होत आहे.

त्यासाठी संबंधितांनी आपले ई- केवायसी लगेचच करुन घ्यावे,असे आवाहनही जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. जिल्हाधिकारी तहसिलच्या दारी या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज तहसील कचेरी येथे आलेल्या अभ्यागतांना दुरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला. सिल्लोड तालुक्यातील सदाशिव बिरगे रा. शिरसाखेडा यांच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे अनुदान प्रलंबित होते. त्यासाठी ई-केवायसी झालेले नव्हते. ते झाल्यास लगेच खात्यात परस्पर पैसे जमा होतील असे सांगण्यात आले. तसेच लिलाबाई कांबळे, कमलाबाई लोखंडे यांच्या शिधापत्रिकांचा प्रश्न होता. त्यांना आजच शिधापत्रिका देण्यात आल्या. घाटनांद्रा येथील अमोल मोरे यांच्या सातबारा उताऱ्यावर दिसणारा बँक कर्जाचा बोजा कमी करावयाचा आहे, त्यासाठी तहसिलदार यांनी तात्काळ कारवाई करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. खुलताबाद येथील सुनिल जाधव रा. कवीटखेडा यांच्या शिधापत्रिकेचा प्रश्नही लगेचच निकाली काढण्यात आला. फुलंब्री तालुक्यातील आळंद येथील समीर पठाण यांच्या तुकडेबंदी अंतर्गत जमिन मोजणीसंदर्भात आजच पत्र देण्यात आले. हा प्रश्न गेल्या ७ वर्षांपासून प्रलंबित होता. तेथीलच जनाबाई देवकर यांचे संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान ईकेवायसी अभावी रखडले असून त्यांचेही तात्काळ ई-केवायसी करावे असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. हरसूल येथील फेरफार प्रलंबित प्रकरणी तलाठ्याची चौकशी करुन आठवड्यात निकाल द्यावा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, लोकांना जिल्हाधिकारी कार्यालयात येण्याचे कष्ट घ्यावे लागू नये तसेच त्यांचा खर्च व वेळ वाचावा म्हणून हा उपक्रम सुरु केला आहे. लोकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात न येता आपल्या तक्रारी, निवेदने हे तहसिलदार कचेरीत दर सोमवार व गुरुवारी सादर करावे. अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर हे मुख्यालयातून तर सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व नागरिक हे दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

# सेलू येथे ८ एप्रिलपासून सेवा संकल्प अभियान; १० एप्रिल रोजी भव्य महाआरोग्य शिबिर

## नागरिकांनी सेवा संकल्प अभियानाचा अवश्य लाभ घ्यावा: पालकमंत्री मेघना बोर्डीकर

**परभणी । प्रतिनिधी**

शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच शासकीय विभाग अधिक लोकाभिमुख करण्याकरीता दि. ८ ते १० एप्रिल २०२५ या कालावधीत सेलू येथील नूतन महाविद्यालयाच्या प्रांगणात सेवा संकल्प अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांच्या माहितीचे स्टॉल, उत्पादक पुरवठादार कंपन्याचे उत्पादने, प्रात्यक्षिके, जनसंवाद, महाआरोग्य शिबीर असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत, याचा लाभ नागरिकांनी अवश्य घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे रुपरेषा पुढील प्रमाणे आहे. सेवा संकल्प अभियानाचे उद्घाटन ८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे. दुपारी २.३० वाजता महिला व बालविकास विभागाशी निगडीत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. ९ एप्रिल रोजी सकाळी १०.०० वाजता परभणी जिल्ह्यातील विविध विकास कामांचा ई-भुमीपुजन / ई-लोकार्पण कार्यक्रम, दुपारी ०२.३० वाजता शेतकरी मार्गदर्शन चर्चासत्र होणार आहे. दि. १० एप्रिल रोजी सकाळी १०.०० वा. महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन होणार आहे. सकाळी ११.०० वा. सेलू येथील महावितरण विभागाच्या कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे.



कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रराजे भोसले, गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म राज्यमंत्री पंकज भोयर, सार्वजनिक आरोग्य व कुंटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्यासह खासदार फौजिया खान, खासदार संजय जाधव, आमदार डॉ. राहूल पाटील, आमदार राजेश विटेकर, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार सतिश चव्हाण, आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, तहसिलदार शिवाजी मगर आदी उपस्थित होते.

# डिजिटल शिक्षणाचे धोरण स्विकारणे काळाची गरज : प्रा. राम शिंदे



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

आधुनिक तंत्रज्ञान युगामध्ये डिजिटल शिक्षण आवश्यक असून डिजिटल शिक्षण धोरण स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

डिजिटल स्कूल' या संकल्पनेअंतर्गत कर्जत तालुक्यातील ८७ व जामखेड तालुक्यातील २४ अशा १११ शाळेतील इंटरॅक्टिव्ह टच पॅनल आणि महाराष्ट्र शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमावर आधारित डिजिटल ई लर्निंग सॉफ्टवेअरचे लोकार्पण सभापती श्री. शिंदे यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे यांच्यासह जिल्ह्यातील गटविकास अधिकारी, शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते.

सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनेकवेळा 'परीक्षा पे चर्चा' या उपक्रमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचा आत्मविश्वास वाढवला आहे. शिक्षण हे तणावमुक्त व सृजनशील असले पाहिजे यावर त्यांनी नेहमीच भर दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली डिजिटल शिक्षणाच्या पर्वाची सुरुवात झाली आहे. त्याला अनुसरूनच ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य साकारले जाणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सर्व विषयांची उकल अत्यंत सुलभपणे होणार आहे. रंगात्मक आणि चित्रकात्मक पद्धतीने विद्यार्थ्यांना विषय समजून सांगता येणार आहेत. फळा, खडू, डस्टर ही संकल्पना नष्ट होत आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर श्री. कौस्तुभ नागेश मराठे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २९४/२०२५**

**भागुबाई विरूध्द दत्ता,**

ज्याअर्थी मयत नामे किसन तुकाराम घुंबार्डे, दिनांक १५.१०.२०१८ रोजी मौजे गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार - १) भागुबाई भ्र. किसन घुंबार्डे, वय ६१ वर्षे, धंदा घरकाम, रा. दाभाडे गल्ली गेवराई ता. गेवराई जि. बीड, २) नवनाथ पिता किसन घुंबार्डे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. दाभाडे गल्ली गेवराई ता. गेवराई जि. बीड

गैरअर्जदार- १) दत्ता पिता किसन घुंबार्डे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. दाभाडे गली गेवराई ता. गेवराई जि. बीड

शासकीय/ निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **किसन तुकाराम मुंबार्डे रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २७/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पुढील तारीख** ०२/०५/२०२५

**(मार्फत ॲड.बी.एम.मुळे)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एफ.बी.बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५९८/२०२५**

**सोमीनाथ व इतर वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः १) सोमीनाथ पि.शंकर फाळके, वय: ५७वर्षे, धंदा: शेती, रा. पोखरी(घाट) ता. जि. बीड, २) कुंडलिक पि.शंकर फाळके, वय: ५५वर्षे, धंदा: शेती, रा. वरील प्रमाणे, ३) बारीकराव पि.शंकर फाळके, वय: ४७वर्षे, धंदा: शेती, रा. वरील प्रमाणे, ४) सौ. रुक्मीण भ्र. गंगाधर धुमाळ, वय : ६३वर्षे, धंदा: घरकाम, रा. धुमाळवाडी, पो.च-हाटा, ता. जि. बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे शंकर गणपती फाळके, राहणार - मौजे पोखरी (घाट), ता. जि. बीड हे दिनांक

०४/०४/२०१४ रोजी मौजे पोखरी (घाट) ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत यांचे मुले असून अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताची पत्नी नामे लखापती भ्र.शंकर फाळके आईवडील फार पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे रामभाऊ पि.आनंदराव कदम, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत शंकर गणपती फाळके यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०८/०५/२०२५ आहे.

आज दिनांक ०५/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ श्री. उबाळे एस. एस.)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
मंगळवार, दि.०८ एप्रील २०२५ पान ४

## पाटोदा येथे रामजन्मोत्सव उत्साहात साजरा



**पाटोदा । प्रतिनिधी**

मर्यादा पुरूषोत्तम प्रभु रामचंद्राचा जन्मोत्सव म्हणजेच राम नवमी पाटोदा शहरात अत्यंत उत्साहात व भक्तीमय वातावरणात विविध कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली. सकाळी शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकी मध्ये राम भक्तांनी दिलेल्या जय श्री राम च्या घोषणांनी पाटोदा शहर दुमदुमून गेले होते. शहरातील प्रभू श्री राममंदिर या ठिकाणी सकाळ पासुनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळी प्रभू श्री राम मंदिराचे विश्वस्थ चंद्रकांत एकबोटे यांच्या हस्ते अभिषेक व महाआरती करण्यात आली , तर दूपारी ठीक १२. वाजता मुख्य राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला, यावेळी उपस्थित भाविकांनी ' रामनामाचा ▶▶ उर्वरित पान २ वर

# घरकुलांचे बांधकाम रखडले वाळु घाटांचा लिलाव सुरु करा

## घरकुल धारकांना मोफत 5 ब्रास वाळूचा शासन आदेश पारीत करा



**● जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन : डॉ.गणेश ढवळे**

**बीड । प्रतिनिधी**

सर्वांसाठी घर हे केंद्र शासनाचे धोरण असुन त्यानुसार बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळावे या हेतूने केंद्र व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येतात.पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना अहिल्यादेवी आवास योजना सह इतर योजनातून बीड जिल्ह्यात जवळपास ७६६६५ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.मात्र वाळु अभावी घरकुलांची बांधकामे रखडली असल्याचे सर्वत्र चित्र दिसुन येत आहे.मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांनी घोषणा केल्याप्रमाणे घरकुल धारकांना मोफत ५ ब्रास वाळु देण्याचे शासन आदेश काढण्यात यावेत, राज्य शासनाच्या वाढीव ५० हजार रूपयांच्या अनुदानातुन १५ हजार सोलरवर खर्च करण्याची अट रद्द करण्यात यावी. बीड जिल्ह्यात वाळु घाटांचे स्थगित लिलाव सुरू करण्यात यावेत. जवळपास४०- ५० हजारांना ५-६ ब्रास वाळू मिळते.वाढत्या महागाईत गोरगरीब घरकुल धारकांना ती परवडत नाही त्यामुळे वरील मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०७ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री , महसूलमंत्री, विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख, पांडुरंग हराळे, जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले आदी सहभागी होते.

मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांनी घोषणा केल्याप्रमाणे घरकुलासाठी मोफत ५ ब्रास वाळूचा आदेश पारीत करावा

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाभियान योजना राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांकरीता रमाई आवास योजना, ▶▶ उर्वरित पान २ वर

## शासकीय कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्यासाठी निवारा शेड व पिण्याच्या पाण्याची सोय करावी

**● उल्हास गिराम यांची जिल्हाधिकारी यांना मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

वाढत्या तापमाणामुळे बीड जिल्यात उष्णतेच्या झलाया वाढत आहेत. उषाघात, मळमळ, चक्कर येणे असे प्रकार वाढत आहेत. शासकीय कामानिमित्त शहरी व ग्रामीण भागातून मोठ्याप्रमाणावर युवक, महिला, वयोवृद्ध येतात. काहींना दिवसभर ताटकळत बसावे लागते. अशा नागरिकांना प्रखरउन्हाचा त्रास होऊ नये म्हणून जिल्यातील प्रत्येक कचेरी कार्यालया बाहेर निवारा शेड व पिण्याचा पाण्याची सोय करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब येणारे तीन महिने प्रखर उष्णतेचे असतील. उष्माघाताच्या घटना वाढण्या आगोदर प्रशासनाने खबरदारी घ्यावी. वेळीच उपाययोजना कराव्यात. विविध शहरात बसस्थानाकाची कामे सुरु आहेत, त्याठिकाणी



ही निवारा असावा. जिल्ह्यातील सर्वच प्रत्येकी तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, सत्र न्यायालय, निबंधक कार्यालय या सह श्यक्य होईल त्या प्रशासकीय कार्यालया बाहेर निवारा शेड व पिण्याच्या पाण्याची सोय करावी, असे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जिल्हाधिकारी अविनाशजी पाठक साहेब यांची भेट घेऊन सदरील मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

या वेळी त्यांच्या समवेत उपजिल्हाप्रमुख अजिनाथ खेडेकर, राजु भाऊ मुहावले, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, शिरूर तालुका सोपान मोरे, कामगार सेनेचे रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, गणेश घुबर्डे, प्रदीप कोटुळे, सतीशसिह परदेशीं, साईनाथ ढाकणे, दिलीप नाना पवार यांच्या सह आदी उपस्थित होते.

## राष्ट्रसंत कैकाडी महाराजांनी मानव जातीच्या कल्याणासाठी काम केले : आ.प्रकाश सोळंके

**अखिल भारतीय कैकाडी महासंघाच्या वतीने माजलगावात राष्ट्रसंत कैकाडी महाराजांची जयंती उत्साहात साजरी**

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी खूप मोठी तपश्चर्या करत समाजामध्ये समता आणि बंधुत्वाची मूल्य रुजवत सर्व मानव जातीच्या कल्याणासाठी आयुष्यभर काम केले असल्याचे मत आमदार प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केले. अखिल भारतीय कैकाडी महासंघाच्या वतीने माजलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दिनांक ६ एप्रिल रोजी राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी आ. सोळंके उद्घाटक ▶▶ उर्वरित पान २ वर



**झालेत गुलाम मोकळे; भिमा तुझ्या जन्मामुळे**

## जयभिम महोत्सवात महापुरुष वक्तृत्व स्पर्धेला प्रतिसाद



**बीड । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बीडमध्ये जयभिम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.७) एप्रिल रोजी महापुरुष वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४३ व्या जयंती निमित्ताने बीडमध्ये ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित केला आहे. सोमवारी या महोत्सवात महापुरुष वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला अध्यक्ष डी.जी.वानखेडे तर प्रमुख पाहुणे म्हणून गुलाब भोले सर, डी.एम.राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. जयभिम महोत्सवाने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी मिळाली.यातून त्यांच्या ज्ञानातही भर पडली.त्यामुळे एक चांगला समाज निर्माण होण्यास ही अतिशय पोषक ठरली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# कपड्याला इस्त्री करताना शॉक बसल्याने तरुणाचा मृत्यू

**गेवराई तालुक्यातील बंगालीपिंपळा येथील दुर्दैवी घटना**



**गेवराई । प्रतिनिधी**

घरात स्वतःच्या कपड्याला इस्त्री करताना अचानक विद्युत प्रवाहाचा तिव्र शॉक बसला. यामध्ये एका ३८ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. हि दुर्दैवी घटना गेवराई तालुक्यातील ▶▶ उर्वरित पान २ वर

**विद्युत डिपीची आर्थिंग फेल, गावातील अन्य चार जणांनाही बसला विजेचा धक्का**

**गणेश याला इस्त्री करताना शॉक बसला, याचवेळी गावातील गावातील वेगवेगळ्या ठिकाणी अन्य तीन जणांना देखील विजेचा शॉक बसल्याची घटना घडली. गणेश याचा चुलत भाऊ दादा तळतकर याला किराणा दुकानातील इलेक्ट्रॉनिक काटा साफ करताना, गंगाधर नवले यांना टिव्हीवर ठेवरेली बीपीची गोळी घेताना तर ज्ञानेश्वर तळतकर यांना बोर्डात मोबाईल चार्जर लावताना तसेच रुक्साना बाबू शेख या चार जणांना तिव्र धक्का बसून दूर फेकले गेले. त्यामुळे ते यामधून बचावले. मात्र गणेशचा दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान ज्या विद्युत डिपीवरुन विजेचा पुरवठा होतो, त्या डिपीची जमीनीतील आर्थिंग फेल असल्यामुळे हि घटना घडल्याचे ग्राम स्थांनी सांगितले. तर अशाचप्रकारे दोन महिण्यांपूर्वी दोन जणांना शॉक बसला होता, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार केले होते. यानंतर महावितरणकडे याबाबत माहिती देऊन डिपीच्या आर्थिंग दुरुस्तीची मागणी करण्यात आली होती. मात्र महावितरणने याकडे दुर्लक्ष केल्यानेच हि दुर्दैवी घटना घडल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत माने यांनी केला आहे.**

## पोलीस वाहन चालकाची लेक बनली डॉक्टर

**कुटुंबाचे स्वप्न साकार करणाऱ्या डॉ. शिवानी खवतड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव**



**बीड । प्रतिनिधी**

न्युज येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात चालक असलेले शिवाजी खवतड यांच्या लेक शिवानी हिने जिद्द व चिकाटीने अभ्यास करुन एमबीबीएस परीक्षेत यश संपादन करुन कुटंबाचे स्वप्न साकार केले. यामुळे शिवानी आणि खवतड परिवारावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. डॉ. शिवानी शिवाजी खवतड हाचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण हे बीड शहरातच झाले. ती अभ्यासात हुशार असल्याने तिने डॉक्टर व्हावे अशी आई-वडील व कुटुंबाचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी तिने जिद्द आणि चिकाटीने अभ्यास केला अन् १० वी मध्ये चांगले गुण घेतल्याने लातूर

येथे दयानंद महाविद्यालयात प्रवेश मिळाला, येथे खाजगी क्लास लावून तिने अभ्यास करीत यश संपादन केले अन् एमबीबीएस साठी प्रवेश मिळाला. मामार मेडिकल कॉलेज तळेगाव दाभाडे (जि.पुणे) हिती येथे एमबीबीएस पूर्ण केले. येथेही अभ्यासात खंड न पडू दिल्याने नेत्रदीपक असे यश संपादन केले. आता ती डॉक्टर झाली आहे. कुटुंबाने पाहिलेले स्वप्न शिवानीने डॉक्टर होऊन पूर्ण केल्याने तिचे कौतुक करण्यात येत आहे. तर डॉ. शिवानी सह खवतड परिवारावर अभिनंदनाचा वर्षाव केला जातो आहे.

# मिस्त्रीची लेक अभिनयात नंबर एक

**बहुचर्चेतील शॉर्ट फिल्म 'वनवा' यामध्ये प्राची ने केली दमदार भुमिका**

**माजलगाव । प्रतिनिधी**

अभिनयामध्ये करिअर करणं हे अनेकांचं स्वप्न असतं. तसे स्वप्न प्राचीने अगदी बालपणापासून पाहिले होते. योगायोगाने माजलगाव येथील पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी त्यांच्या शॉर्ट फिल्मसाठी ऑडिशन घेतले, तेव्हा त्यांना प्राची सारखी दमदार अभिनय करणारी अभिनेत्री भेटली, एकीकडे बाळासाहेब आडागळे यांना दमदार अभिनय करणारी अभिनेत्री मिळाली आणि दुसरीकडे अभिनय करण्यासाठी



संधी मिळाल्याने प्राचीचे स्वप्न साकार होत असल्याने तिच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. एका गावंड्याची मुलगी अभिनय क्षेत्रात दमदार पदार्पण करीत असल्याचे पाहून सर्वसामान्य व्यक्तींना देखील याचा मनस्वी आनंद झाल्याचे पहावास मिळाले.

आकाशाला गवसणी घालण्याची इच्छाशक्ती

असेल तर परिस्थिती आडवी येत नाही! क्षेत्र कोणतेही असो तुम्ही तुमच्या ध्येयाशी प्रामाणिक असाल तर घरची परिस्थिती कितीही हालाखीची असली आणि घरात अठरा विश्व दारिर्थ असले तरी तुमचे ध्येय साध्य करण्यापासून कोणीच रोखू शकत नाही. आकाशाला गवसणी घालायची प्रबळ इच्छाशक्ती तुमच्या मनात असेल तर तुम्हाला तुमची परिस्थिती आडवी येऊच शकत नाही. आज मी हेच अनुभवत आहे, पत्रकार बाळासाहेब आडागळे यांनी मला त्यांच्या शॉर्ट फिल्ममध्ये संधी देऊन माज्या स्वप्नांना बळ दिले त्यामुळे मी त्यांची आभारी आ, हे अशी प्रतिक्रिया अभिनेत्री प्राची हिने व्यक्त केली.

वडीलांसोबत प्राची

गवंड्याची पोरगी अभिनय करतेय याचा मला अभिमान वाटतो !!: माझ्या सगळ्या पिढ्या ▶▶ उर्वरित पान २ वर




## डॉ. संजय राऊत आणि डॉ. सदाशिव राऊत यांचा महात्मा फुले युवा दलाच्या वतीने सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयात महात्मा फुले युवा दलाच्या वतीने आज जिल्हा शल्य चिकित्सकपदी नुकतीच नियुक्ती झालेल्या डॉ. संजय राऊत आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सकपदी नियुक्त झालेल्या डॉ. सदाशिव राऊत यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी महात्मा फुले युवा दल प्रमुख एडवोकेट सतीश शिंदे ,माजी जिल्हा परिषद सदस्य तथा सरपंच राजेंद्र अण्णा राऊत, महात्मा फुले युवा दल पाटोदा तालुकाप्रमुख गणेश मोहळकर, डॉ. अक्षय भोपळे, रमेशभाऊ दुधाळ, सतीश कातखडे, युवा नेते दीपक भुजबळ, फैयाज पठाण, अमोल खीवनसरा आदी मान्यवर उपस्थित होते.